www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी





मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 356   गुरुवार दि. 11 सप्टेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

# 16 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा प्रयत्न

## विद्यार्थ्यांसाठी प्रशासनाचा मोठा निर्णय

**मुंबई** : राज्यात दरवर्षी घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १६ हजार विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र या शिष्यवृत्तीचा लाभ अधिकाधिक गुणवंत विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी सारथीच्या बरोबरच आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग व अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून ही शिष्यवृत्ती देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी या तिनही विभागांकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आल्याने लवकरच याची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी काही मोजक्याच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. त्यामुळे अन्य गुणवंत विद्यार्थी हे शिष्यवृत्तीच्या लाभापासून




वंचित राहतात. परीक्षेसाठी मेहनत करूनही शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याने या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. तसेच शिष्यवृत्ती न मिळाल्याने त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांना या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे यंदापासून १६ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीचा आर्थिक भार विविध विभागांमध्ये वाटून घेण्यात येणार असून आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग व अल्पसंख्याक विभागाशी चर्चा करण्यात आली आहे. या विभागांनीही त्यांच्या कक्षेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत सकारात्मकता दर्शवली आहे. याबाबत अंतिम प्रारूप तयार करण्याचे काम सुरू असून लवकरच अंतिम निर्णय होण्याची शक्यता असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली.

**यंदा चौथी, पाचवी, सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा**

राज्यातील अनेक जिल्हा परिषद, नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये बहुतांश शाळा या इयत्ता चौथी किंवा सातवीपर्यंतच आहेत. त्यामुळे इयत्ता पाचवी व आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येऊ लागल्याने या शाळांमधील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेतून बाहेर फेकले जाऊन त्यांचे नुकसान होत आहे. अधिकाधिक लाभ व्हावा यासाठी यंदा इयत्ता पाचवी व आठवी बरोबरच इयत्ता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांचीही परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय महिनाभरात प्रसिद्ध करण्यात येईल असेही दादा भुसे यांनी सांगितले.

**शिष्यवृत्ती किती?**

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्तीसाठी पुढील तीन वर्षासाठी वार्षिक पाच हजार रुपये तर इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्तीसाठी पुढील दोन वर्षासाठी वार्षिक साडेसात हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळते.

२०२४-२५ च्या परीक्षेत ३१ हजार विद्यार्थी पात्र राज्यभरात फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी ९ लाख ४४ हजार ४६३ विद्यार्थांनी नोंदणी केली होती. त्यात इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्तीसाठी ५ लाख ६६ हजार ३६८ तर इयत्ता आठवीसाठी ३ लाख ७८ हजार ९५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी इयत्ता पाचवीतील १ लाख ३० हजार ८४६ आणि इयत्ता पाचवीतील ७० हजार ५७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शासनमान्य मंजूर संचानुसार शिष्यवृत्तीसाठी पाचवीतील १६ हजार ६९३ विद्यार्थी तर आठवीतील १५ हजार ९३ विद्यार्थी पात्र ठरले होते.

## आष्टी तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी
: मारुती सत्रे

बाजीज क्रीडा मंडळ वाघळुज व श्री संत कैकाडी महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय वाघळुज यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा सन २०२५-२६ च्या १७ वर्ष वयोगटातील मुले यांचा बक्षिस वितरण समारंभ कार्यक्रम दिनांक १३ सप्टेंबर २०२५ शनिवार रोजी सायंकाळी ५:३० साडेपाच वाजता श्री संत कैकाडी महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय वाघळुज ता.आष्टी या ठिकाणी आयोजक संतोष श्रीधर गुंड शेतकरी संघटना तालुकाध्यक्ष यांनी आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून धैर्यशील हनुमंत थोरवे लोकमान्य शिक्षण संस्थाचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत.हे बक्षिस वितरण युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, युवा नेते यश (भैय्या)आजबे,युवा नेते अजय(दादा) धोंडे,राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष ऋषिकेश दरेकर,तेजवार्ताचे संपादक बबलूभाई सय्यद,पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी,आज मराठीचे संपादक अविशांत कुमकर,पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांच्या हस्ते होणार आहे. तरी या बक्षिस वितरण समारंभाच्या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक संतोष श्रीधर गुंड यांनी केले आहे.





## महाराष्ट्र सरकारची सिख समाजाबाबत ऐतिहासिक पावले : भाई जसपालसिंह सिद्धू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र सिख समाजाच्या ११ सदस्यीय वेल्फेअर कमिटीचे प्रमुख भाई जसपालसिंह सिद्धू यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नरीमन पॉइंट, मुंबई येथील 'भारत रत्न' राजीव गांधी इन्स्टिटयूट येथे भेट घेतली. या भेटीत सिख समाजाच्या अग्नी बंजारा, लबाना आणि सिक्खलिंगायत बंधूंबाबत संबंधित भटक्या जातीच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले. या प्रसंगी भाई हरनामसिंह खालसा, हॅपी सिंग सदस्य महाराष्ट्र राज्य अल्पसंख्य आयोग आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी मिळून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार केला आणि आभार मानले.

भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी सिख समाजाशी निगडित विविध प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेतली. भाई जसपालसिंह सिद्धू यांनी सांगितले की, ही भेट केवळ विकास व कामकाजापुरती मर्यादित नव्हती, तर महाराष्ट्र सिख समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी ऐतिहासिक ठरणारी ठरली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सहकार्यामुळे लबाना आणि सिक्ख लिंगायत समाजाच्या आरक्षणासंबंधीच्या समस्या सुटल्या आहेत. समाजाच्या हितासाठी घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे भावी पिढ्यांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. भाई जसपालसिंह सिद्धू म्हणाले की, "ही केवळ सुरुवात आहे. महाराष्ट्र सिख समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आम्ही वचनबद्ध आहोत." त्यांनी विशेषतः हे अधोरेखित केले की, २०२४ पासून महाराष्ट्र सिख समाजाच्या गरजा व प्रश्न सोडविण्यासाठी कार्यवाही गतीमान होईल.










## साखरचौथ गणेशोत्सव उत्साहात – श्रीवर्धनात पारंपरिक कार्यक्रमांची रेलचेल









**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला बसवला जाणारा साखरचौथ गणपती यावर्षीही भक्ती व उत्साहात साजरा होत आहे. कोकणातील रायगड जिल्ह्यातील या वैशिष्ट्यपूर्ण परंपरेला अनेक वर्षांचा इतिहास लाभला असून, श्रीवर्धन दांडा, पाच रस्ता येथील साखरचौथ गणेशोत्सव मित्र मंडळाने आज गणपती बाप्पाची स्थापना करून या परंपरेला उजाळा दिला आहे.

या गणपतीची 'नवसाला पावणारा गणपती' अशी ख्याती असल्याने दरवर्षी भाविक मोठ्या श्रद्धेने या ठिकाणी हजेरी लावतात. मंडळाच्या वतीने यंदा लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तर रात्री पारंपरिक बैठक नृत्य व हिंदी–मराठी गाण्यांचा सुमधुर कार्यक्रम रंगणार आहे. यावर्षी मंडळाच्या गणेशोत्सवाचे अकरावे वर्ष पूर्ण होत असल्याने विशेष उत्साहाचे वातावरण आहे.

साखरचौथ गणेशोत्सव केवळ दांडा, पाच रस्त्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण श्रीवर्धनात साजरा केला जातो. मुळगाव कोळी समाज श्रीवर्धन, गणेश आळी श्रीवर्धन, रोहिदास नगर श्रीवर्धन, मेटकर्णी, धोंडगल्ली श्रीवर्धन अशा विविध विभागांमध्ये देखील गणपती बाप्पाची स्थापना करून मनोभावे पूजा-अर्चा केली जाते. स्थानिकांच्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा होणारा हा गणेशोत्सव श्रीवर्धन तालुक्यातील सांस्कृतिक परंपरा आणि एकोपा जपणारा ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

# गजानन पाटील यांचा गणेशोत्सव निम्मित अनोखा उपक्रम, प्रसादा ऐवजी शालेय साहित्य आणण्याचे भक्तांना आव्हान.

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

–डोंबिवली जवळील काटई गावातील सामाजिक कार्यकर्ते श्री गजानन जयवंत पाटील हे त्यांच्या घरगुती गणेशोत्सव दरम्यान गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकी ही संकल्पना मागील १० वर्षांपासून राबवत आहेत. यंदाचे हे ११ वे वर्ष होते.ही संकल्पना अशी आहे की, गजानन पाटील यांनी गणेश भक्तांना आवाहन केल्याप्रमाणे त्यांच्या घरी गणपती दर्शनाकरिता येताना गणेश भक्तांनी कोणत्याही प्रकारे हार,फूल,निष्ठांना वगैरे न आणता आपल्या इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य बापांच्या चरणी अर्पण करावे जेणेकरून हे जमा झालेले शैक्षणिक साहित्य दुर्गम भागातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करता येतील. गजानन पाटील यांच्या आवाहनाला शिक्षणप्रेमी



गणेश भक्तांकडून प्रतिवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यंदा सुद्धा मोठ्या प्रमाणावर बाबांच्या चरणी विविध प्रकारे शालोपयोगी शैक्षणिक साहित्य जमा झाले. हे जमा झालेले शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य भिवंडी तालुक्यातील कासणे जिल्हा परिषद शाळेत आदिवासी बांधवांचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा गरजू विद्यार्थ्यांना मंगळवारी (ता.०९/०९/२०२५) वाटप केले. हे शैक्षणिक साहित्य वाटपापूर्वी आगरी समाजातील प्रसिद्ध निवेदक तथा जादूगर श्री राम पाटील यांचे जादूचे प्रयोग सुद्धा झाले. हे जादूचे प्रयोग शाळेचे विद्यार्थी कुतूहलाने पाहत होते. कारण त्यांनी असे जादूचे प्रयोग यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. शैक्षणिक साहित्य वाटपावेळी सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील यांच्या सोबत शिक्षण प्रेमी हभप हनुमान महाराज पाटील, हभप महेश संते, जे के पाटील शाळेचे संचालक गजानन पाटील सर, माजी उपसरपंच फुलचंद पाटील, माजी सरपंच गिरीधर पाटील, जादूगर राम पाटील,कर्सन पाटील, गणेश पाटील, मंगेश खुटारकर,शशी पाटील, सुनिल पाटील,ज्ञानेश्वर चौधरी,युवराज पाटील,उपस्थित होते. शैक्षणिक साहित्य वाटपाकरिता कासणे शाळेचे मुख्याध्यापक मनोहर मडके यांच्यासह कासणे ग्रामपंचायत माजी सरपंच विद्यमान सदस्य भावनाताई भोईर व भगवान शेठ भोईर, खैरपाडा शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली बागुल मॅडम व खानिवली शाळेच्या मुख्याध्यापिका घायवट मार्ग यांचे सहकार्य लाभले.

शैक्षणिक साहित्याचे वाटप यावेळी जिल्हा परिषद शाळा कासणे तसेच खाणीवली, बामणे,खैरपाडा या चार गावातील एकूण २५० आदिवासी समाजातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

आपले पाच दिवसीय घरगुती गणेशोत्सव दरम्यान गणेश भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक साहित्य जमा झाले होते.हे शैक्षणिक साहित्य आज आपण भिवंडी तालुक्यातील कासणे जिल्हा परिषद शाळा तसेच खानिवली, बामणे व खैरपाडा या दुर्गम भागातील शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना वाटत केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आम्हालाही खूप आज आनंद झाला.ज्ञानेश्वरी मध्ये संत ज्ञानेश्वरांनी सुद्धा गणपती बाप्पा विषयी नोंद केली आहे. 'देवा तूंचि गणेशु सकळमती प्रकाशु" याचा अर्थ तूच गणपती आहेस जो सर्वांच्या बुद्धीला प्रकाश करणारा आहे.याप्रमाणेच आमच्या बुद्धीमध्ये प्रकाश पडल्यानेच तसेच ही संकल्पना आपण राबवत आहोत तसेच कवि ग. दी. माडगूळकरांच्या प्रसिद्ध कवितेप्रमाणे म्हणजेच "देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी" म्हणजेच देव हा चराचरी आहे. या पंक्तीप्रमाणे आम्ही सुद्धा या गरजू विद्यार्थ्यांमध्ये देव शोधण्याचा प्रयत्न केला."*

## पनवेल तालुका पत्रकार विकास मंच इंडियन ऑइल आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने "वृक्ष संवर्धन साक्षरता दिन" साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंच इंडियन ऑइल आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी साक्षरता दिनाच्या औचित्याने "वृक्ष संवर्धन साक्षरता दिन" साजरा करण्यात आला. या अभियाना अंतर्गत माझे झाड या अभियानाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते तर आमदार विक्रांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी इंडियन ऑइल कंपनीचे उच्चपदस्थ देखील उपस्थित होते.




उच्चपदस्थ व्हिडिओ कॉन्फरन्स सुरू असल्यामुळे आयुक्त मंगेश चितळे या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. परंतु त्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागाने अत्यंत काटेकोर पद्धतीने नियोजन केल्यामुळे कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. त्यामुळे पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने अध्यक्ष मंदार दोंदे,खजिनदार संजय कदम,उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सरचिटणीस हरेश साठे आणि सन्माननीय सदस्य प्रवीण मोहोकर यांच्या शिष्टमंडळाने आयुक्त मंगेश चितळे यांना शाल प्रदान करून, "माझे झाड" या अभियानाचे सन्मानचिन्ह भेट दिले.

तसेच या कार्यक्रमाला येण्याची तीव्र इच्छा असून देखील ईद–ए–मिलाद निमित्त निघालेल्या जुलूस साठी पोलीस बंदोबस्ताचे पर्यवेक्षण करणारे पनवेल शहर पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना देखील शाल व सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

## बनावट बिले सादर करून वैध मापन कार्यालयाची फसवणूक - कृषि उत्पन्न बाजार समिती लाखनी येथील ६० मे. टन क्षमतेचा वाहन काटा जप्त - डॉ. दिपराज इलमकार यांच्या प्रयत्नाला यश

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

लाखनी: कृषि उत्पन्न बाजार समिती लाखनी येथील तत्कालीन संचालक मंडळ यांनी सन २०२० मध्ये ६० मे. टन क्षमतेचा नवीन वाहन काटा बाजार समिती लाखनीच्या मुख्य यार्डात बसविला. नियमाप्रमाणे कोणताही वाहन काटा सुरु करण्यापूर्वी त्याला निरीक्षक वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून त्याची पडताळणी व मुन्द्रांकन करून घ्यावी लागते. त्याकरिता सदर कार्यालयाकडे वाहन काट्याचे पक्के खरेदी बिल व ज्या कंपनीच्या नावाने वाहन काट्याचा बिल असेल त्याच कंपनीचा मांडेल अप्प्रोवल व इतर कागदपत्रे असणे अनिवार्य व बंधनकारक आहे. तत्कालीन संचालक मंडळ यांनी मे. वेटोट्रानिक्स वेईंग सिस्टीम रायपुर यांच्याकडून वाहन काटा रु. ५,०८,५८०/– व १००० किलो वजने रु. ७०,०००/– विकत घेतले नसतांनाही त्याच्या नावांनी जीएसटी चे बनावट बिल तयार केले आहे जेव्हा कि सदर जीएसटी नंबर हा दि. ०१.१०.२०१९ ला रद्द करण्यात आला असतांनाही सदर बनावट बिल वैध मापन शास्त्र कार्यालय, साकोली येथे दि. १४.०३.२०२०



ला सादर करून विभागाची फसवणूक केली असल्याची सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र, विभागीय कार्यालय, नागपूर येथे सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिपराज इलमकार यांनी तक्रार दिली होती. वैध मापन शास्त्र कार्यालयांनी तक्रारीची चौकशी केली असता वाहन काट्याचा सनसुई कंपनीचा बिल सादर केला आहे त्याच कंपनीचा माडेल अप्प्रोवल सादर करणे अनिवार्य असतांनाही त्यांनी फिलिप्स कंपनीचा माडेल अप्प्रोवल सादर करून विभागाची फसवणूक केली असल्याने व सदर वाहन काटा हा non standared असल्याचे सिद्ध झाल्याने तो सुरु ठेवता येत नाही. त्यामुळे सदर वाहन काटा पा. मा. बिरादार, सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र विभागीय कार्यालय, नागपूर यांच्या मार्गदर्शनात अ. रा. कोहरू, निरीक्षक, वैध मापन शास्त्र कार्यालय, साकोली यांनी सदर वाहन काटा दि. ०९.०९२०२५ ला जप्त करून त्याला शील करून वाहन काटा बंद केले आहे. सदर वाहन काटा बंद झाल्यामुळे समितीचे अंदाजे दरमहा रु. ६०,०००/– चे आर्थिक नुकसान होणार असल्याची गावात चर्चा सरू झाली आहे. चौकशीत असेही निष्पन्न झाले आहे कि मे. वेटोट्रानिक्स वेईंग सिस्टीम रायपुर यांनी बाजार समिती. लाखनी यांना ६० मे. टन क्षमतेचा वाहन काटा रु. ५,०८,५८०/– व १००० किलो वजने रु. ७०,०००/– कधीही विकत दिले नसून त्यांनी समितीच्या नावानी बिल सुध्दा दिले नसल्याचे बयान दिले आहे तर समितीचे सचिव संजय पारोदे यांनी मे. वेटोट्रानिक्स वेईंग सिस्टीम रायपुर यांच्याकडून ६० मे. टन क्षमतेचा वाहन काटा व १००० किलो वजने विकत घेतले नसल्याचे बयान दिले आहे. तर वैध मापन शास्त्र कार्यालय साकोली येथे बाजार समितीने मे. वेटोट्रानिक्स वेईंग सिस्टीम रायपुर चे बनावट बिल सादर करून लोकांची व शासनाची फसवणूक करण्याचे तत्कालीन संचालक मंडळाचे काय प्रयोजन होते याबाबत चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिपराज इलमकार यांनी केली असून जीएसटी ची चोरी करून खोटे व बनावट बिल सादर करून लोकांची व शासनाची दिशाभूल करून फसवणूक केली असल्याने तत्कालीन संचालक मंडळ व इतर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

संपर्क: 8329227551
डॉ. दीपराज

# कष्टकरी कुटुंबातील शिक्षकांचा गौरव.

## 9 सप्टेंबरला वितरण सोहळा पार पडला, पुणे महापालिकेचा आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**पुणे:-** महापालिका प्राथमिक शिक्षण विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मनपा कार्यक्षेत्रातील प्राथमिक शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण १५ शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये १० शिक्षक महापालिकेच्या शाळांतील, तर ५ शिक्षक खासगी प्राथमिक शाळेतील आहेत. या पुरस्कारासाठी वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील रिठद येथील कष्टकरी शेतकरी कुटुंब असून या कुटुंबातील एक हिरा कुणाल अरविंद ताजने हा लहानपणापासून हुशार असणाऱ्या या विद्यार्थ्याने पुण्यातील महापालिकेतील हडपसर येथील शाळेमध्ये शिक्षकाची नोकरी करत असतांना अनेक सन्मान प्राप्त केले.त्यामध्ये यावर्षी महापालिकेच्या ज्ञानसागर प्राथमिक विद्यामंदिर हडपसरच्या माध्यमातून केलेल्या सर्वेक्षणात कुणाल ताजने याचाही सन्मान होणार असल्याचे पत्र दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी कुणाल ताजने यास प्राप्त झाल्याने या गाव खेड्यातील गरीब कुटुंबातील कुणाल अरविंद ताजने या कुटुंबाला आपल्या आपल्या सन्मानाप्रती आनंद झाला असून आई–वडिलांची कायम इच्छा असते आपल्या मुलाने उत्तरोत्तर प्रगती करावी व मानसन्मान वाढवावा यातच आई–वडिलांचे सुख आणि समाधान आहे अशी प्रतिक्रिया देतांना आई–वडिलांनी सांगितले. या पुरस्कारासाठी एकूण ५६ अर्ज ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झाले होते. शासनाने ठरवलेल्या निकषांनुसार निवड समितीने दस्तऐवजांची तपासणी, मुलाखत व वर्गभेटीच्या आधारे गुणवत्तेनुसार शिक्षकांची निवड केली. पुरस्कार विजेत्यांना मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि टॅब देऊन सन्मानित करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण समारंभमंगळवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ९.१५ वाजता पद्मावती येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात संपन्न झाला आहे.याचा आनंदही रिठद गावकऱ्यांना झाला असून त्याला भ्रमनध्वनी द्वारे शुभेच्छा देण्यात आल्या व आई–वडिलांचेही हितचिंतकांनी शब्द सुमनाने मुलाप्रती चांगला संवेदना व्यक्त केल्या.




# जनसुरक्षा विधेयका विरोधात काँग्रेस कम्युनिस्टसह विविध संघटनांचा नेवासा तहसीलवर मोर्चा

## महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी:-**
**लखन वाल्हेकर**

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक मागे घेण्यात यावे या मागणीसाठी राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष ,शेतकरी संघटना, वंचित बहुजन आघाडी, बसपा, बरोबरच विविध संघटनांकडून नेवासा तहसील कार्यालयावर आज मोर्चा काढण्यात येऊन जनसुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावे या मागणीचे निवेदन देण्यात आले. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात अधिवेशनामध्ये महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक – २०२४ मंजूर करण्यात आले. राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर या विधेयकावर हरकती घेण्यात आल्या तर सदर हरकती या विधेयक रद्द करा अशा स्पष्ट होत्या. परंतु या हरकतीची दखल न घेता पाशवी बहुमताच्या जोरावर विधेयक मंजूर करण्यात आले. विधिमंडळाच्या समितीने कोणालाही




प्रत्यक्ष म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही. या विधेयकात बऱ्याच गोष्टी वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत यात प्रामुख्याने शहरी नक्षलवाद याचा उल्लेख केला आहे या शब्दाच्या नावाखाली सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, सरकारी धोरणावर आवाज उठविणाऱ्या संघटना यांची गळचेपी, मुस्कटदाबी करण्यासाठी, जेरबंद करण्यासाठी हत्यार म्हणून वापर करणे शक्य होणार आहे. घटनेने भारतीय नागरिकांना जाब विचारण्याचा, टीका करण्याचा, सरकारी धोरणाची चिकित्सा करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला आहे. अनेक प्रश्नावर आवाज उठविणे, हक्कासाठी लढणे हे बेकायदेशीर ठरविले जाणार आहे. याच्या नावाखाली सरकार कोणत्याही संघटनेला सरकार बेकायदेशीर ठरवू शकते.या विधेयकामुळे लोकशाही धोक्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या जुलमी कायद्या विरोधात आज राज्यभर महाविकास आघाडी व कम्युनिस्ट पक्षाकडून निदर्शने केली आहे. आज नेवासा तालुक्यात देखील राष्ट्रीय काँग्रेस,भारतीय कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी संघटना, वंचित बहुजन आघाडी, आरपीआय, भारतीय स्वाभिमानी संघ, यांच्याकडून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येऊन जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी कॉम्रेड नेते बाबा अरगडे यांनी हे विधेयक आणून लोकशाही संपविण्याचा घाट सरकारने घातला असा आरोप केला.काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी हे विधेयक जनतेच्या सुरक्षेचे नसून सरकारने स्वतः च्या सुरक्षेसाठी आणलेले विधेयक आहे असा आरोप केला. शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे यांनी हा कायदा नागरिकांच्या मूलभूत हक्काची गळचेपी करणारा असून तातडीने मागे घ्यावा असे मत मांडले. काँग्रेसचे अंजुम पटेल यांनी लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या सरकारला आता नेपाळ सारखी क्रांती करून हिसका दाखविण्याची वेळ आल्याचे स्पष्ट केले.गणपत मोरे यांनी लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी या कायद्या विरोधात मोठी चळवळ उभारण्याचे आवाहन केले. तसेच यावेळी भारत अरगडे, शेतकरी संघटनेचे त्र्यंबक भदगले, बसपाचे हरीश चक्रनारायण, विजयसिंह गायकवाड, शंकर भारस्कर आदींनी आंदोलनास संबोधित केले. या आंदोलनात संजय वाघमारे,आप्पा वाबळे, लक्ष्मण कडू, बाबासाहेब सोनपुरे, भीमराज आगळे, कारभारी गायकवाड, भाऊसाहेब अरगडे, अशोक जाधव आदीसह नागरिक सहभागी झाले होते. यावेळी विधेयका विरोधात व सरकार विरोधात जोरदार घोषणा बाजी करत नेवासा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

## सुरेश जाधव सर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर** : घाटकोपर येथील ज्ञानप्रकाश विद्यालयाचे सुरेश शंकर जाधव सर गेली आठरा वर्षे कलाशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षक दिनानिमित्त कला साधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्यांना 'परमपूज्य साने गुरुजी राष्ट्रस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार 2025' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सुलेखनकार व पद्मश्री पुरस्कार प्राप्त अच्युत पालव सर यांच्या हस्ते देण्यात आला. कला शिक्षक जाधव यांनी चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. चित्रकला स्पर्धा, फलक लेखन यांसारख्या उपक्रमांतून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना रुजवली.

कार्यक्रमाचे आयोजन कला साधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अनघा जाधव यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिगंबर तायडे, कॅप्टन मनोज भामरे व श्री. रामजीत गुप्ता उपस्थित होते.



दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# हैदराबाद गॅझेट लागू करुन बंजारा समाजाला एस.टी.सवलतीचे आरक्षण द्या

## बंजारा बांधवांचे तहसीलदार यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



कळंब: बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस टी) प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी गोर बंजारा शिकवाडी राज्यात बैठकांचे सत्र सुरू झाले आहे.महाराष्ट्र शासनाने *हैदराबाद गॅझेटिअर नोंदी लागू केल्यामुळे,तेलंगणा आणि आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही आदिवासींचा दर्जा मिळावा अशी मागणी जोर धरत आहे.इतिहासाचा दाखला देत, बंजारा समाजाला आदिवासी मानले जावे अशी भूमिका या मागणीसाठी घेतली जात आहे. ऐन-ए-अकबरीमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख 'आदिम जनजाती' म्हणून करण्यात आला आहे, तर १७९३ मध्ये इंग्रजांनी केलेल्या सर्वेक्षणात आणि १८८१ च्या जनगणनेतही 'बंजारा ट्राईब'असा उल्लेख होता.महाराष्ट्रात विलीन झाला.त्यावेळी मराठवाड्याची १९७७ च्या क्षेत्र प्रतिबंधित अधिनियमामुळे अनुसूचित जमातींच्या आरक्षणापासून वंचित राहावे लागले.हैदराबाद गॅझेटिअर नोंदीनुसार, बंजारा (लंबाडी) हे आदिवासी आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने आता हा निर्णय लागू करून बंजारा समाजावर झालेला अन्याय दूर करावा आणि त्यांना अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करावे,अशी मागणी संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यातील बंजारा समाजबांधव करत आहेत. या मागणीसाठी राज्यात मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू आहेत.निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा, लंबाडा,लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्रप्रदेशातील बंजारा,लंबाडा जातीना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडा सह विदर्भ खानदेशचा भाग महाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळचे असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षण संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले.त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एस टी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे

जिल्हाधिकारी यांना गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात आज १० सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले.त्यामध्ये असे नमूद केले आहे की,महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाजवळ १९५० अगोदर अनुसुचित जमातीचे दुर्मिळ पुरावे असून क्रिमीनल ट्राईब कायद्याने बाधीत असूनही सेंट्रल प्रोवीन्स व बेरार प्रांतामध्ये तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्थान दिलेले होते.मात्र भाषावार प्रांतरचना, राज्य पुनर्चना कायद्याचा फटका महाराष्ट्रातील गोरबंजारा लमाण लंबाडी यांना बसला असून मुळ आरक्षणाला मुकावे लागले आहे,यासाठी गोरबंजारा समाजाने सातत्याने संघर्ष पुकारला असून त्यांना न्याय देण्यासाठी बापट आयोग,इधाते आयोग,भाटीया आयोग,डिएनटी एस टी आयोगाने महाराष्ट्रातील गोरबंजारा हा अनुसुचित जमातीचे आरक्षणाबाबत सकारात्मक शिफारशी करुनही त्यांना ते आरक्षण देण्यात आलेले नाही.डोंगर दर्यात राहणारा समाज आजही आदीम समुदायाची सर्व पात्रता पूर्ण करतो कारण स्वतंत्र बोली,भाषा,पेहराव,धाटीपरपंरा, स्वतंत्र तांडावस्ती,खानपान,स्वतंत्र असूनही त्यांना एस टी आरक्षणा पासून जाणीवपूर्वक टाळले जात आहे. अनुसूचित जमातीचे आरक्षणाबाबत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक,राष्ट्रसंत रामराव महाराज सह अन्य समाजसुधारकांनी सातत्याने प्रयत्न केले असून -गोरसेना या बंजारा समाजातील अग्रगण्य संघटनेने गेल्या विस वर्षापासून मोर्चा आंदोलने केलेली आहेत.मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण लागू होते त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा तेच गॅझेट लागू करुन एस टी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार मार्फत केलेली आहे.आज दिनांक १० सप्टेंबर रोजी अप्पर तहसीलदार कार्यालय मेटीखेडा तालुका कळंब येथे निवेदन देण्यात आले यावेळी हसमुख राठोड,सरपंच सुरज संगीत जाधव(गोर सेना ता अध्यक्ष),विरेंद्र चव्हाण (जिल्हाध्यक्ष विमुक्त घुमंतू जणजाती),विनोद.भा.चव्हान, दिवाकर वसंता जाधव,रवी राठोड (ता उपाध्यक्ष),वृषभ प्रकाश राठोड,(श. अध्यक्ष)पियुष के राठोड (गोरसेना बॉईज अध्यक्ष),प्रकारा म. राठोड ,नारायण चव्हाण,अभिराज आडे,प्रविन रं. राठोड संदेश अ. राठोड,आनंदराव सा.राठोड,बंटी राठोड,विश्वनाथ आडे,सुनिल आडे,निकेस भाऊराव राठोड,सुमित चव्हाण,अविनाश जाधव या सह अनेक बंजारा समाज बांधव उपस्थित होते.

# शिक्षक दिनी विजय राठोड यांची स्वराज्य शिक्षक संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी निवड.

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र उपसंपादक**
**(राजू शिंदे)**

शिक्षक दिनाच्या निमित्ताने स्वराज्य शिक्षक संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी विजय सतनाम राठोड यांची निवड झाली आहे.

विनाअनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सतत धडपड करणारे, संघटनेची सर्व कामे तत्परतेने पार पाडणारे तसेच आझाद मैदानावरील आंदोलनांमध्ये आपल्या सहकाऱ्यांना सहभागी करून घेणारे म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या मेहनती व चिकाटीच्या जोरावर जिल्हाध्यक्ष पदाचा मान त्यांना प्राप्त झाला आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत सर्वसंमतीने राठोड यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्वराज्य शिक्षक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही निवड करण्यात आली.

नेहमीच विनाअनुदानित शिक्षकांसाठी लढवय्या म्हणून ओळखले जाणारे विजय राठोड हे त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये “नेहमी आवाज उठवणारे, न्याय मिळवून देणारे नेतृत्व” म्हणून प्रसिद्ध आहेत.

त्यांच्या या निवडीबद्दल स्वराज्य शिक्षक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश चव्हाण, ज्ञानेश्वर शेळके, शंकर शेरे, गिरीश मखमले ,दत्तात्रय चव्हाण, विजय सुराशे, जहीर काझी ,गणेश सुराशे गैबिनाथ वायळ इत्यादी सर्व राज्य पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील शिक्षक वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी काळात विनाअनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी अधिक प्रभावी भूमिका बजावावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञान वापरून थेरगाव चिंचवड येथील पवना नदीवरील बटरफ्लाय ब्रिज रंगीबेरंगी इलेक्ट्रिक दिव्याचा झगमगाठ आणि आकर्षक विद्युत रोषणाई

**दैनिक युवक आधार**
**. शिवाजी वाघमारे. चिखली पुणे**

थेरगाव चिंचवड येथील पवना नदीवरील बटर फ्लाय ब्रिज रंगीबेरंगी झगमगाटाने उजळलेला आकर्षक पूल सर्वाना मनमोहवून टाकत आहे विविध रंगाची छटा निर्माण करणारी आकर्षक विधुत रोषणाई असा वेगळाच अनुभव थेरगाव तें चिंचवड दरम्यानच्या बटर फ्लाय ब्रिजवरुण प्रवास करताना नागरिकांना येत आहे. पवना नदीवर उभारलेला हा ब्रिज आता विद्युत रोषणाईनच्या झळाळीने अधिकच खुलून दिसत असून रात्रीच्या वेळी ब्रिजवर साकार होणारा नयनरम्य रंगोस्त्व नागरिकांना आकर्षित करीत आहे



# कामोठे मधील सबस्टेशनसाठी महावितरणला भूखंड ताबा द्यावा – आ .प्रशांत ठाकूर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

वीज ग्राहकांना अखंड वीज पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी कामोठे सेक्टर २५ येथील नवीन सबस्टेशनचे काम लवकरात लवकर सुरु होण्याची आवश्यकता असून त्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला प्रस्तावित भूखंडाचा ताबा देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याकडे केली आहे. माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी कामोठे येथे सबस्टेशन उभारण्याची मागणी केली होती. मात्र कोरोना काळ व इतर तांत्रिक बाबीमुळे हा विषय रेंगाळत राहिला होता त्या अनुषंगाने डॉ. अरुणकुमार भगत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सदरचा विषय मांडला होता. तो मार्गी लावण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन दिले. यावेळी त्यांच्यासोबत आमदार महेश बालदी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत उपस्थित होते.



या संदर्भात दिलेल्या निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, पनवेल, कामोठे या परिसरांतील वाढते नागरीकरण व वाढती लोकसंख्या यामुळे विद्युत पुरवठ्याची वाढती मागणी यावर उपाययोजना म्हणून कामोठे सेक्टर २५, भूखंड क्रं.२५ येथे नवीन ३३/११ केव्ही सबस्टेशन उभारण्याचे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीतर्फे ठरविले होते व त्याप्रमाणे गेली काही वर्षे त्यांचेमार्फत सदर भूखंड ताब्यात मिळणेकरिता सिडकोकडे प्रयत्न चालू होते. सदर भूखंड ताब्यात देण्याकरिता सिडको प्रशासनाने भाडेपट्टा रक्कमेसह अन्य रक्कम भरण्याबाबत महावितरणकडे कळविले होते. त्यानुसार महावितरणने प्रथम १० टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर आता उर्वरित सर्व रक्कमेचा भरणा महावितरणतर्फे करण्यात आला असून तसे त्यांनी सिडको महामंडळाला कळविले असून तरी पुढील प्रक्रियेच्या अनुषंगाने सदर भूखंडाचा ताबा महावितरणला त्वरीत देणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित करावे, जेणेकरून लवकरात लवकर सबस्टेशनचे काम पूर्ण करून नागरिकांना अखंडीत वीजपुरवठा करणे महावितरणला शक्य होईल.

# मतिमंदाच्या पालकत्वासाठी अर्ज करणाऱ्यांवर वाद, तक्रारीचे आक्षेप असल्यास लेखी निवेदन सादर करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**राकेश यादव प्रतिनिधी वाडी नागपूर**

नागपूर, दि. १० राष्ट्रीय विश्वस्त अधिनियम १९९९ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना कायदेशीर पालकत्वासाठी स्थानिक स्तर समितीपुढे ४ पालकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. या यादीतील पालकत्व घेणाऱ्यांचे नाव व मतिमंद पाल्यांच्या नावांची यादी यावर परिवारातील आप्त-स्वकीय, नातेवाईकांचे वाद, हरकती, तक्रारी वा आक्षेप असल्यास आक्षेपकर्त्यांनी आठवडाभरात जिल्हा परिषद, नागपूर येथील जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवुन हरकतीसाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी केले आहे. जिल्हा परिषद येथील जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी, जि.प. नागपूर या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर पालकत्वासाठी अर्ज करणाऱ्या ४ अर्जदारांच्या नावांची यादी लावण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर येथे संपर्क (कार्या दुरध्वनी क्रं. ०७१२-२५६४३२४) करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुरुडमध्ये गणेशोत्सवानंतर कारवाईचा वाद : भक्तांच्या भावनांना धक्का, व्यापाऱ्यांचा स्वेच्छेने बंद

**दैनिक युवक आधार**
**लातूर /मोहम्मद पिंजारी**



गणेशोत्सव हा मुरुडच्या संस्कृतीत केवळ धार्मिक सोहळा नाही, तर श्रद्धा, एकात्मता आणि उत्साह यांचा मिलाफ आहे वर्षभर मेहनतीचे पैसे साठवून, सजावट व सांस्कृतिक कार्यक्रम आखून गणेश मंडळे उत्सव साजरा करतात मात्र, यंदाच्या गणेशोत्सवाचा शेवट मुरुडमध्ये आनंदापेक्षा गोंधळ, कारवाई आणि निराशेत झाला. डीजे/डॉल्बी प्रकरणावरून ७७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल झाल्याने शहरात तीव्र असंतोष पसरला. व्यापाऱ्यांनी स्वतःच्या मनाने दुकाने बंद ठेवून निषेध नोंदवला. विसर्जनाची मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झाली होती. ढोल-ताशांच्या गजरात, आरत्यांच्या स्वरात आणि “गणपती बाप्पा मोरया”च्या अखंड घोषात शहर भक्तिभावाने न्हाऊन निघाले. महिलांनी पारंपरिक पोशाख घातले, लहान मुले आरत्या म्हणत होती, तर युवक उत्साहाने झेंडे फडकवत होते. हा क्षण भक्तीचा, आनंदाचा आणि एकात्मतेचा होता, पण त्यानंतरच्या कारवाईने संपूर्ण चित्र बदलून गेले. पोलिसांनी विसर्जनाच्या दोन दिवसांनी ७७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले. “आम्ही उत्सव साजरा करीत होतो, गुन्हे करत नव्हतो,” असे भावनिक उद्गार कार्यकर्त्यांनी व्यक्त केले

गुन्हे दाखल झालेल्यांमध्ये अनेक तरुणांचा समावेश आहे, जे भविष्यात समाजाच्या विविध क्षेत्रात पुढे जाण्याचे स्वप्न पाहतात. मात्र त्यांच्या नावावर गंभीर गुन्हे दाखल झाल्याने युवकांना कायद्याच्या कसोटीत अडकावे लागणार आहे. एका युवकाने संतापाने म्हटले, “वर्षभर आम्ही खर्च आवरून बाप्पासाठी पैसा साठवतो, कार्यक्रम राबवतो. पण एका क्षणात गुन्हेगार ठरवलं जातो? हा आमच्या मेहनतीचा, श्रद्धेचा अपमान नाही का?” या कारवाईचा परिणाम म्हणून शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने स्वेच्छेने बंद ठेवली. कुणाच्याही दडपणाखाली नाही, तर भावनांच्या अभिव्यक्तीसाठी हा बंद पाळण्यात आला. मुरुडची बाजारपेठ सुनसान पडली. एका ज्येष्ठ व्यापाऱ्याने सांगितले, “हा बंद रागाचा नाही, दुःखाचा आवाज आहे. गणेशोत्सव शहराला एकत्र आणतो, पण या कारवाईमुळे आनंदावर विरजण पडलं.” विसर्जनाच्या दिवशी रात्री झालेल्या गोंधळामुळे महिला व लहान मुले पळत होती, अनेकांचे डोळे पाणावले

“डीजे/डॉल्बीचा प्रश्न चर्चेतून, संवादातून सुटू शकला असता, पण श्रद्धेच्या क्षणी गुन्हे दाखल करणे लोकांच्या मनावर घाव करते,” असे कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केले. मानव अधिकाराचा उल्लंघन तसेच प्रतिष्ठित व्यक्तींवर गुंडांसारखे वागणूक का?, आणि सामाजिक परिणाम लक्षात घेऊन योग्य पद्धतीने कारवाई करणे अत्यावश्यक आहे, असे अनेकांनी सांगितले. कायद्याचा अंमल महत्त्वाचा आहेच, पण श्रद्धा, भावना आणि परंपरेला घाव पोहचवू नये, ही शिकवण अधोरेखित झाली आहे. मुरुडकरांना हा अनुभव कधीही विसरता येणार नाही – उत्सव भक्ती, आनंद आणि ऐक्याने साजरा व्हायला हवा होता, पण शेवट कारवाई, गुन्हे आणि तणावात झाला. शहरातील प्रत्येक भक्ताच्या मनात आजही एकच हाक आहे: “आमच्यावर गुन्ह्यांचा डाग नको.”

“गणेश भक्तांवर कारवाई योग्य नाही; मुरुड हे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा जपणारे तसेच सर्वधर्मसमभाव जपणारे गाव आहे, त्यामुळे पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई थांबवावी; अन्यथा मुरुडमधील सर्व अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, नाहीतर महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, याची प्रशासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी.”

**–दादासाहेब वसंतराव काळे, जिल्हाध्यक्ष, स्वराज्य पक्ष लातूर**

# नांदेड विमानसेवा पूर्वत सुरू करण्यात आली आहे राज्यसभा खासदार डॉ अजित गोपछेडे यांच्या प्रयत्नाला यश

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** येथील गुरुगोविंद सिंग जी विमानतळाची धावपट्टी खराब झाल्याने येथील विमानसेवा स्थगित करण्यात आली होती. मात्र नांदेडची विमानसेवा पूर्ववत सुरू करावी यासाठी मी राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, केंद्रीय मंत्री राम मोहन नायडूजी , विमान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळजी यांच्याकडे पाठपुरावा केला होता . त्यामुळे आजपासून नांदेडचे विमानतळ पूर्ववत सुरू होत आहे.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड विमानतळालाही फटका बसला होता. यामुळे विमानतळाच्या धावपट्टीवर अनेक खड्डे पडले होते. धावपट्टीवर खड्डे पडल्याने विमान सेवेला स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे येथील उड्डाण बंद झाली होती. परिणामी नांदेडच्या तीर्थक्षेत्रासह शिक्षण उद्योगक्षेत्राला फटका बसला होता ही बाब लक्षात घेता नांदेड येथे देश विदेशातून गुरुद्वारात तख्त सचखंड हुजूर साहेब येथे दर्शनासाठी येणाऱ्या प्रवाशांना गैरसोय होऊ नये , उद्योजक , व्यापारी , विद्यार्थी , एन आर आई , शासकीय अधिकारी , प्रगतशील शेतकरी आदीनाही विमानसेवेचा लाभ मिळावा यासाठी केंद्रीय उड्डाण मंत्री राममोहन नायडूजी , केंद्रीय विमान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळजी यांची भेट घेऊन हे विमानतळपूर्वत सुरू करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. आज उपराष्ट्रपती निवडीसाठी मतदानाची प्रक्रिया सुरू असतानाही अत्यंत घाईगडबडीच्या






वेळेतही केंद्रीय मंत्र्यांची भेटी घेऊन नांदेड येथील विमानतळ सुरू करण्यासाठी चर्चा केली.

त्यामुळे केंद्रीय उड्डाण मंत्री नायडू आणि मोहोळ यांनी संबंधित विभागाचे अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश देत हे विमानतळ पूर्वत सुरू करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उद्या दिनांक 10 सप्टेंबर पासून नांदेड येथील विमानतळ पूर्ववत सुरू होत आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, माननीय विमान मंत्री राममोहन नायडूजी, विमान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळजी ,माजी मुख्यमंत्री खासदार अशोकरावजी चव्हाण यांची मनपूर्वक आभार

# गौरव राऊत चे जिल्ह्यातील आदिवासी महीलाच्या रोजगारासाठी पुण्यात प्रयत्न

## सस्थेच्या वतीने १०४ महीलाना स्थानिक पातळीवरच दीला रोजगार

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

तालुक्यातील तुपटाकळी येथील गौरव रमेश राऊत या युवकांने मृदूगध सोशल कनेक्ट या सस्थेच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांना रोजगार मिळवून दिला

यवतमाळ येथील मारेगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात कोलाम आदिवासी समुदाय राहतो. त्यांच्या रोजगारसाठी नेचरल एजुकेशन फॉर ,इकोलॉजिकल डेवलपमेंट, हि संस्था काम करते. या संस्थेअंतर्गत तानाबाना हा महिला साक्षिमीकरण प्रकल्प चालतो त्यामध्ये प्रामुख्याने त्या महिला दोहड, बेडशीट असे प्रोडक्ट बनवतात. या प्रोडक्टला यवतमाळ या ठिकाणी मार्केट उपलब्ध नसल्याकारणाने त्याना ते विक्री करण्यास अडचणी येतात. यावरच उपाय म्हणून मृदुगंध सोशल कनेक्ट या संस्थेच्या माध्यमातून संस्थापक गौरव राऊत यांनी वस्तूना पुण्यातील वेगवेगळ्या IT कंपनी, सोसायटी, आणि प्रदर्शनामध्ये विक्री करण्यासाठीचे व्यासपीट उपलब्ध करून देतात. पुण्यात या सगळ्या प्रोडक्टला भरभरून प्रतिसाद मिळत असून या सगळ्या प्रयत्नामुळे यवतमाळ येथील १०४ आदिवासी महिलांना त्यांच्या स्थानिक पातळीवरच रोजगार उपलब्धकरुन दिला

गौरव मागील दहा वर्षांपासून पुण्यामध्ये आहे त्याचे शिक्षण कर्वे समाजसेवा संस्था नामवंत इन्स्टिट्यूट मधुन समाजकार्य यामध्ये पदवीत्तर पदवी घेऊन शिक्षण पूर्ण केले चार-पाच वर्ष वेगवेगळ्या सामाजिक संस्थांमध्ये नोकरी केली आपल्या संस्थेच्या माध्यमातून आपल्या यवतमाळ जिल्ह्यातील रोजगाराना फायदा करायचा या अनुषंगाने गौरवने मृदृगध सोशल कनेक्ट या संस्थेची स्थापना करून यवतमाळ जिल्ह्यातील कोलम आदीवासी समाजातील महीलाना रोजगार मिळवून दिला आहे. मृदुगंध सोशल कनेक्ट हि संस्था ग्रामीण भागात काम करत असलेल्या छोट्या छोट्या सामाजिक संस्थाना पुण्यासारख्या ठिकाणी हक्काच व्यासपीठ उपलब्ध करून देते. ज्याद्वारे त्या संस्थानी बनविलेल्या प्रोडक्टला पुण्यात मार्केट उपलब्ध करून दिले जात. आज जवळजवळ १० सामाजिक संस्थाना मृदुगंध द्वारे मार्केट मिळाल असुन त्या मधून बऱ्याच गरजू आणि आदिवासी महिलाना ग्रामीण भागात रोजगार प्राप्त झाला आहे. अशा सामाजिक बांधिलकी असणार्या युवकाचा गावाला सार्थ अभिमान वाटतो



# दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिर

**दैनिक युवक आधार**
**उरण/सायली साळुंके**

दि. 8 सप्टेंबर2025 रोजी ग्रामीण रूग्णालय उरण या रूग्णालयात जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व मा. मुख्यमंत्री सहायता निधी धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिर घेण्यात आले या शिबिरात डॉ. विजय मसकर(मानसोपचार तज्ञ), डॉ. मृणालीली कदम (अस्थिव्यंग तज्ञ ), डॉ. पवन महाजन (नेत्ररोग तज्ञ), डॉ. बाबासो काळेल (वैद्यकीय अधीक्षक) ग्रामीण रुग्णालय उरण, श्री राजू ठाकूर सामाजिक कार्यकर्ते व उरण दिव्यांग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री. महेंद्र म्हात्रे उपस्थीत होते. या शिबिरात अस्थिरोग तपासणी, नेत्र तपासणी, मानसिक आजाराची तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यामध्ये एकूण ११० दिव्यांग लाभार्थीनीं नोंद केली व त्यातील पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करून तपासणी करून व कागदपत्राची पडताळणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासो काळेल (वैद्यकीय अधीक्षक) तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष मेहनत केली. तसेच उरण तालुक्यातील सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.




# अनधिकृत कंटेनर यार्ड व बेकायदेशीर पार्किंगच्या विळख्यात उरणकर

## छोट्या वाहनांसाठी स्वतंत्र लाईन ठेवण्याची उरण तालुका मराठी पत्रकार संघाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी /प्रदीप पाटील**

उरण तालुक्यातील बेकायदेशीर कंटेनर यार्ड व अनधिकृत पार्किंगचा कहर दिवसेंदिवस वाढत आहे. उरणकरांचे जीवन प्रदूषण, वाहतूक कोंडी व कंटेनर ताफ्यांच्या तडाख्यात अक्षरशः नरकयातना झाले आहे. एकेकाळी हिरवागार व भाताच्या दाण्यांनी भरलेला हा तालुका आज औद्योगिकरणाच्या नावाखाली धुरकट, धुळकट आणि धोकादायक परिसरात बदलला आहे. स्थानिक जनतेसाठी उभारण्यात आलेले सर्व्हिस रोड आज कंटेनरवाल्यांच्या ताब्यात गेले आहेत. दिवसरात्र धावणाऱ्या कंटेनर व ट्रक ताफ्यांमुळे ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन उध्वस्त झाले आहे. रुग्णवाहिका वेळेत रुग्णालयात पोहोचत नाही, शाळकरी मुलं कोंडीत अडकून वेळेत पोचत नाहीत, नोकरदार वर्गाला प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागतो. अशा भयावह परिस्थितीत शासन व प्रशासन ठार गप्प बसले आहे. पत्रकार संघाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, या गंभीर प्रश्नावर शासनाने तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडीवर तोडगा म्हणून रस्त्यावरील एक लाईन कायमस्वरूपी छोट्या वाहनांसाठी मोकळी ठेवण्यात यावी. ही मागणी ही फक्त नागरिकांची अपेक्षा नसून, आता जगण्याचा प्रश्न झाला आहे. दरमहा लाखोंच्या हप्त्यांच्या जोरावर अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली आहे, असा संशय उरणकरांच्या मनात घर करून बसला आहे. अनधिकृत कंटेनर यार्ड व पार्किंगवाल्यांना पोसून जनतेच्या जीवाशी गद्दारी करणारे अधिकारी व शासन यांचा पर्दाफाश करणे आता उरण तालुका मराठी पत्रकार संघ आपले कर्तव्य समजतो. अनधिकृत कंटेनर यार्ड व बेकायदेशीर पार्किंगवर तात्काळ कारवाई करा, छोट्या वाहनांसाठी स्वतंत्र लाईन कायमस्वरूपी मोकळी ठेवा, उरणकरांना वाहतूक कोंडी व प्रदूषणाच्या विळख्यातून तातडीने मुक्त करा. त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी शासन प्रशासनाचीच राहील. उरणकरांच्या जिवाशी केलेला खेळ आता सहन केला जाणार नाही. उरणकरांना श्वास घेण्यासाठी मोकळा मार्ग द्या, नाहीतर हा रोष ज्वालामुखीप्रमाणे उसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.




# आलेख्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि हार्ट केअर सेंटर कडून रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाणे यांनी केली चौकशीची मागणी

## जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सकांकडे निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**



जिल्ह्यातील धर्माबाद येथे स्थित असलेले आलेख्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि हार्ट केअर सेंटर कडून रुग्णांची आर्थिक लूट होत असल्या बाबतची पुराव्यासह लेखी तक्रार देऊन सदर हॉस्पिटची तत्काळ चौकशी करुन चौकशी अंती दोषारोप सिद्ध होताच संबधित डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे केली आहे.

सविस्तर वृत्त असे की, रुग्ण रामजी महादू भद्रे बाभूळगांव ता. धर्माबाद यांना पोटात दुखत असल्यामुळे आलेख्या मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल व हार्ट केअर सेंटर धर्माबाद येथे उपचारासाठी दिनांक 30 ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आले होते दुसऱ्या दिवशी डॉ. अरुण मोरे यांनी पेशंटच्या नातेवाईकांची दिशाभूल करुन पेशंटची किडनी व लिव्हर डॅमेज झाल्याचे सांगितले त्यानंतर इतर काही कार्यकर्त्यांनी विचारपूस केल्यावर फक्त किडनीवर सूज आल्याचे सांगितले. रुग्णाच्या लकोणत्याही प्रकारच्या तपासणी न करता लिव्हर डॅमेज झाल्याचे सांगितल्याने डॉक्टरांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे. किडनीवर सूज आल्याचे सांगून रुग्णांच्या नातेवाईकांची दिशाभूल केली आहे. डॉक्टरांनी खोटे बोलल्याचे क्षण सिसिटीव्ही मध्ये कैद झाले आहे ते तपासल्यास सत्य बाहेर येईल असे नातेवाईकांचे म्हणणे आहे. डॉक्टर दिशाभूल करत असल्याचे लक्षात येताच सदर रुग्नाला नातेवाईकांनी नांदेड येथील श्री गंगा हॉस्पिटल नांदेड येथे खाजगी रुग्णालयात दाखल केल्या नंतर तेथील डॉक्टरांनी त्यांना जनरल वार्ड मध्ये ठेऊन उपचार केला आहे. त्यामुळे धर्माबाद येथील आलेख्या हॉस्पिटलच्या डॉक्टरांकडून रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याचे रुग्णाच्या नातेवाईकांचे म्हणणे असल्याने या गंभीर बाबीची चौकशी जिल्हा शल्य चिकित्सक करतील का? याकडे रुग्णांच्या नातेवाईकांचे लक्ष लागून आहे.

# पुरवठा विभागाचे अधिकारी जबाबदारी टाळण्यात पटाईत; प्रत्येक प्रश्नावर ‘अधिकार नाही, तहसीलदारांशी बोला’ उत्तर”

## नागरिकांच्या कामांकडे बोट दाखवून टाळाटाळ; कार्यालयात उडवाउडवीची संस्कृती


**दैनिक युवक आधार**
**( उदगीर प्रतिनिधी ) बालाजी तेलंगे**

उदगीर तालुक्यातील पुरवठा विभागाचे अधिकारी सुमित्रा आण्णाराव इलमिले हे नागरिकांना कोणताही स्पष्ट निर्णय अथवा योग्य मार्गदर्शन देण्याऐवजी जबाबदारी झटकण्याचे काम करत असल्याचा आरोप होत आहे.

नागरिकांनी कोणतेही प्रश्न किंवा शंका विचारल्या की, “तो अधिकार आमच्याकडे नाही, तहसीलदार यांना विचारा” असे सांगून अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात. यामुळे कार्यालयीन कामासाठी वारंवार हेलपाटे मारणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शासनाने नागरिकांच्या सोयीसाठी पुरवठा कार्यालय स्थापन केले असले तरी तेथे अधिकार आणि जबाबदारी ढकलण्याचा खेळ सुरू असल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्यांच्या या टाळाटाळ वृत्तीमुळे शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यात अनेकांना अडथळे येत आहेत.

नागरिकांचा संताप ओसंडून वाहत असून ते “शासनाचे अधिकारी की फक्त जबाबदारी टाळणारे दूत?”




असा सवाल करत आहेत.

**जनतेची मागणी:**

पुरवठा अधिकाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी व्हावी

नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडवाव्यात

जबाबदारी ढकलण्याऐवजी पारदर्शक व उत्तरदायी सेवा देण्या ऐवजी विनाकारण नागरिकास खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देता .

उदगीर तहसिल कार्यालयात पारदर्शक व उत्तरदायी सेवा मिळल का ?

संबधीत वरिष्ठ अधिकारी हे सुधा पुरवठा अधिकारी यांना पाठीशी घालणार आहेत आशी चर्चा चौका चौकात नागरिक करत आहे .

# वाघळुज येथे भव्य शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**आष्टी (प्रतिनिधी) बाळासाहेब रकटाटे**



बाजीज क्रिडा मंडळ वाघळुज आणि श्री संत कैकाडी महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय वाघळुज यांच्या संयुक्त विद्यमाने सन 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी 17 वर्षांखालील मुलांच्या शालेय कबड्डी स्पर्धेचे भव्य उदघाटन शनिवारी, दि. 13 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 9.30 वा. मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून ॲड. हनुमंत थोरवे (सचिव, लोकमान्य शिक्षण संस्था) उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ. सिमा काळे (गटशिक्षणाधिकारी आष्टी), मा. श्री. अविनाश काळे (तालुका क्रीडा अधिकारी, आष्टी), मा. श्री. पांडुरंग देविचंद पवार( मुबई पोलिस), मा. श्री. सागर (शेठ) आमले ( सरपंच, अंभोरा), मा. नसिर अब्दुल रहेमान शेख, मा. बाळु विठ्ठल गुंड (युवा तालुका अध्यक्ष शेतकरी संघटना), मा. ज्ञानेश्वर पिंगळे (SRPF) यांची उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय प्रमुख उपस्थितीमध्ये मा. राजेंद्र चितळे, मॅनेजर मा. कैलास वाळके, मा. संजय गुंड (चेअरमन), मा. संतोष रघुनाथ चौधरी, युवा नेते मा. महादेव डोके, मा. अमोल विक्रम गुंड, मा. विश्वनाथ भुदाजी राठोड (माजी पोलीस), मा. आकाश गटकळ मेजर, मा. विशाल (आण्णा) गुंड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन श्री. संतोष श्रीधर गुंड (सभापती पं.सं. आष्टी व रयत क्रांती ॲग्री फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. स्पर्धा स्थळ : श्री संत कैकाडी महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय वाघळुज, ता. आष्टी, जि. बीड या भव्य कबड्डी स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना आपल्या गुणांचे दर्शन घडविण्याची मोठी संधी उपलब्ध होणार असून गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शिक्षकच आहेत जीवनातील दीपस्तंभ- सुधीर घरत

**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती भारतामध्ये शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. याच शिक्षक दिनाचे औचित्य साधून सुधीर घरत सामाजिक संस्था, नवघर- उरण यांच्या विद्यमाने वीर वाजेकर महाविद्यालयातील शिक्षकांचा गुणगौरव समारंभ दि. 8 सप्टेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आला होता.

महाभारतातील युद्धाचा संदर्भ देत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा महाविद्यालय विकास समिती सदस्य सुधीर घरत म्हणाले की, “कौरव हे पांडवांपेक्षा सैन्य संख्या, सेनानी आणि विविध दले तसेच पराक्रमी योद्धे या सर्वच बाबतीत वरचढ होते ,परंतु कौरवांकडे कृष्णासारखा मार्गदर्शक नव्हता म्हणूनच पांडव युद्ध जिंकू शकले. जीवनात मार्गदर्शक हा नेहमी दीपस्तंभासारखे कार्य करतो. तो आपल्याला योग्य वाटेवर मार्गक्रमण करण्यासाठी प्रकाश दाखवत असतो. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सध्याचा काळ आव्हानात्मक असला तरी समाजातील भावी पिढी घडवण्यासाठी शिक्षक त्यांच्या परीने चांगले प्रयत्न करीत आहेत. याच चांगल्या प्रयत्नांना दाद म्हणून आमच्या संस्थेने वीर वाजेकर महाविद्यालयातील शिक्षकांचा गौरव केला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर सर यांनीदेखील याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्याआणि शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक असून त्याच्या कृतिशील व गतिशील विद्यार्थांना प्रेरित करून सदृढ समाज परिवर्तनाचे कार्य करू शकतो असे मत व्यक्त केलेव या गौरवामुळे प्रेरित होऊन आणखी चांगल्या प्रकारे काम करण्याची ऊर्जा मिळाली असे सांगितले. या शिक्षक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी हर्षदा महाकाळ आणि प्रणाली सपकाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या शिक्षक गुणगौरव समारंभ प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक,प्रशासकीय सेवक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पेन, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील नॅशनल कॅडेट कोर मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना देखील सी सर्टिफिकेट तसेच विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याशिवाय महाविद्यालयातर्फे माजी विद्यार्थी श्री सुधीर घरत पुरस्कृत आयोजित




राष्ट्रीय फोटोग्राफी स्पर्धेचे निकाल देखील जाहीर करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गजानन चव्हाण यांनी तर कार्यक्रमाचे आभार स्टाफ वेल्फेअर कमिटीच्या चेअरमन सुप्रिया नवले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ. सुजाता पाटील व डॉ. श्रेया पाटील यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमास शोभा आली. महाविद्यालयातील स्टाफ वेल्फेअर कमिटीने या कार्यक्रमाच्या आयोजनात पुढाकार घेतला. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय सेवक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते

# कामोठे मधील सबस्टेशनसाठी महावितरणला भूखंड ताबा द्यावा – आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

वीज ग्राहकांना अखंड वीज पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी कामोठे सेक्टर २५ येथील नवीन सबस्टेशनचे काम लवकरात लवकर सुरु होण्याची आवश्यकता असून त्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला प्रस्तावित भूखंडाचा ताबा देण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याकडे केली आहे. माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी कामोठे येथे सबस्टेशन उभारण्याची मागणी केली होती. मात्र कोरोना काळ व इतर तांत्रिक बाबीमुळे हा विषय रेंगाळत राहिला होता त्या अनुषंगाने डॉ. अरुणकुमार भगत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सदरचा विषय मांडला होता. तो मार्गी लावण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन दिले. यावेळी त्यांच्यासोबत आमदार महेश बालदी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत उपस्थित होते.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, पनवेल, कामोठे या परिसरांतील वाढते नागरीकरण व वाढती लोकसंख्या यामुळे विद्युत पुरवठ्याची वाढती मागणी यावर उपाययोजना म्हणून कामोठे सेक्टर २५, भूखंड क्रं.२५ येथे नवीन ३३/११ केव्ही सबस्टेशन उभारण्याचे महाराष्ट्र राज्य विज



वितरण कंपनीतर्फे ठरविले होते व त्याप्रमाणे गेली काही वर्षे त्यांचेमार्फत सदर भूखंड ताब्यात मिळणेकरिता सिडकोकडे प्रयत्न चालू होते. सदर भूखंड ताब्यात देण्याकरिता सिडको प्रशासनाने भाडेपट्टा रक्कमेसह अन्य रक्कम भरण्याबाबत महावितरणकडे कळविले होते. त्यानुसार महावितरणने प्रथम १० टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर आता उर्वरित सर्व रक्कमेचा भरणा महावितरणतर्फे करण्यात आला असून तसे त्यांनी सिडको महामंडळाला कळविले असून तरी पुढील प्रक्रियेच्या अनुषंगाने सदर भूखंडाचा ताबा महावितरणला त्वरीत देणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित करावे, जेणेकरून लवकरात लवकर सबस्टेशनचे काम पूर्ण करून नागरिकांना अखंडीत वीजपुरवठा करणे महावितरणला शक्य होईल.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# अपोलो ने निरोगी वृद्धत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी उचलले महत्त्वाकांक्षी पाऊल

## 2050 पर्यंत देशातील वृद्धांची संख्या 319 दशलक्ष होईल

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई,**
१० सप्टेंबर २०२५: भारतातील आघाडीचे मल्टी-स्पेशालिटी क्वाटरनरी केअर हॉस्पिटल, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई (AHNM) ने आज त्यांच्या सिनियर्स फर्स्ट जेरियाट्रिक्स क्लिनिकची घोषणा केली, ही एक विशेष सेवा आहे जी रुग्णांच्या गरजा लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिकांच्या विशिष्ट आरोग्यसेवा गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेली आहे. या क्लिनिकचे नेतृत्व अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील जेरियाट्रिक्समधील कन्सल्टन्ट डॉ. सायली दामले आणि डॉ. श्वेत सबनीस करतील. प्रतिबंधात्मक, पुनर्वसन आणि दीर्घकालीन काळजी समर्थन तसेच सातत्यपूर्ण काळजी एकाच छताखाली उपलब्ध असेल, मग ते रुग्णालयात असो किंवा घरी. अपोलो नवी मुंबईने ७५-९६९६-९४९४ एक समर्पित हेल्पलाइन क्रमांक सुरू केला आहे, जो ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही आरोग्यसेवेच्या गरजांसाठी वापरता येईल.

भारताच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. असा अंदाज आहे की, २०५० पर्यंत देशातील वृद्धांची संख्या ३१९ दशलक्ष होईल - जवळजवळ पाच भारतीयांपैकी एक ज्येष्ठ नागरिक असेल. आज, जवळजवळ चार पैकी तीन ज्येष्ठांना किमान एका दीर्घकालीन आजाराने ग्रासले आहे, तर जवळजवळ अर्ध्या लोकांना हालचाली किंवा चालण्या-फिरण्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. तरीही, वृद्धापकाळासाठी विशेष काळजीची उपलब्धता दुर्मिळ आहे, देशात १०० पेक्षा कमी प्रशिक्षित जेरियाट्रिक्स तज्ञ आहेत, वास्तविक पाहता त्यांची गरज हजारोंमध्ये असल्याचा अंदाज आहे.




अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील जेरियाट्रिक्स क्लिनिक ज्येष्ठांच्या आरोग्याच्या प्रत्येक पैलूला व्यापणाऱ्या विस्तृत सेवा देईल. यामध्ये व्यापक वृद्धरोग मूल्यांकन, दीर्घकालीन रोग व्यवस्थापन, पडणे आणि कमजोरी प्रतिबंध कार्यक्रम, गतिशीलता आणि संतुलन प्रशिक्षण, पोषण आणि आहार सल्ला, कॉग्निटिव्ह आरोग्य समर्थन आणि मानसिक आरोग्य सेवांचा समावेश आहे. शस्त्रक्रियेनंतरची काळजी, फिजिओथेरपी आणि पुनर्वसन आणि रुग्णालय भेटी सुलभ करण्यासाठी कन्सीर्ज सहाय्य देखील ज्येष्ठांना उपलब्ध असेल. अपोलो होमकेअर आणि अपोलो २४/७ यांच्या सहकार्याने, नर्सिंग केअर, फिजिओथेरपी, डायग्नोस्टिक्स आणि औषध व्यवस्थापन यासारख्या आवश्यक सेवा रुग्णालयाबाहेरही उपलब्ध असतील, ज्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मदतीचे एक अखंड चक्र निर्माण होईल.

डॉ.सायली दामले, जेरियाट्रिक मेडिसिन कन्सल्टन्ट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाल्या,"वृद्धत्व हा आजार नाही- हा एक नैसर्गिक जीवन प्रवास आहे ज्यासाठी करुणा, समजूतदारपणा आणि अनुकूल वैद्यकीय काळजी आवश्यक आहे. या समर्पित जेरियाट्रिक्स क्लिनिकद्वारे आम्हाला एपिसोडिक उपचारांच्या पलीकडे जाऊन समग्र, प्रतिबंधात्मक आणि सातत्यपूर्ण देखभालीकडे जायचे आहे. प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला त्यांच्या आयुष्यातील सोनेरी वर्षे आरोग्य, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्यासह जगण्याची संधी मिळाली पाहिजे आणि आमचे क्लिनिक त्यांच्यासाठी एक मजबूत सहयोगी ठरेल."

डॉ. श्वेत सबनीस, जेरियाट्रिक मेडिसिन कन्सल्टन्ट, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले,"वृद्धांच्या गरजा अनेकदा जटिल आणि एकमेकांमध्ये गुंतलेल्या असतात - जुनाट आजार आणि हालचाली, चालण्या-फिरण्याच्या चिंतांपासून ते मानसिक आरोग्य आणि पुनर्वसनापर्यंत विविध गरजा असतात. हे क्लिनिक वन-स्टॉप सोल्यूशन म्हणून डिझाइन केले आहे, जे सुनिश्चित करते की ज्येष्ठ आणि त्यांच्या कुटुंबियांना प्रत्येक गरजेसाठी स्वतंत्र काळजी घेण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागणार नाही. आमचा दृष्टिकोन वैद्यकीय कौशल्य आणि सहानुभूती यांना एकत्र आणतो, जेणेकरून त्यांना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असलेला आधार मिळत राहील."

श्री विशाल लाठवाल, सीईओ, अपोलो होमकेअर म्हणाले,"अपोलो होमकेअर आणि सीनियर्स फर्स्ट जेरियाट्रिक्स क्लिनिकच्या जोडीने, आम्ही आता ज्येष्ठ नागरिकांच्या घरी रुग्णालयासारखी दर्जेदार देखभाल उपलब्ध करवून देत आहोत. घराच्या परिचित वातावरणात बरे होण्याचे चांगले परिणाम मिळतात हे सिद्ध झाले आहे आणि ज्येष्ठ नागरिक आधीच आमच्या ग्राहक समुदायाचा एक मोठा भाग असल्याने, ही गरज स्पष्ट आणि महत्त्वाची आहे. आमचा व्यापक पोर्टफोलिओ घरामध्ये देखभालीच्या बहुतेक गरजा पूर्ण करतो. हा एकात्मिक काळजी दृष्टिकोन अतिरिक्त सोयी आणि सुधारित परिणामांसह काळजीची सातत्य सुनिश्चित करतो."

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मेंडका येथे मा. मिलिंद खोडके सरांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा उत्साहात पार पडला

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका येथील कर्तव्यदक्ष व विद्यार्थ्यांप्रती निस्वार्थ भावनेने कार्य करणारे शिक्षक मा. मिलिंद खोडके सर हे नियत वयोमानानुसार दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ सेवाकाळातील कार्याचा गौरव करण्यासाठी दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजी शाळेत भव्य सेवानिवृत्ती सोहळा आयोजित करण्यात आला.

आखनगिरे सर यांनी सुत्र संचालन केले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओमप्रकाश बलदवा सर होते. प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापिका पवार मॅडम, बी.ओ. मॅडम प्रिया डाहाळे, केंद्र प्रमुख वारकाड सर, शा.व.स. अध्यक्ष सुभाष जनजावळे, उपाध्यक्ष प्रशांत निखाते, ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मण ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते यांचा समावेश होता.व मेंडका नगरीचे पोलिस पाटील गोविंद वसुरे तसेच इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वनाथ चंदलवाड सर, वस्तीशाळा सेवानिवृत्त मुख्याध्यापक बोदमवाड सर, व शंकर पामलवाड सर,गंगाधर दासरे, तुळशीराम चुकेवाड, प्रविण गायकवाड, लक्ष्मण देवदे, कैलास गोडशे, बजरंग खोडके, सूर्यकांत चौदंते, माधव कदम मा.नगराध्यक्ष सुनील शेट्टे,मा.नगरसेवक कैलास चंद्रे,किशोर पारवेकर,पिंटू ठाकूर,विनोद चव्हाण, कपिल लोखंडे व मित्र परिवार... जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मेंडका येथे मा. मिलिंद खोडके सरांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा उत्साहात पार पडला

मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) :
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका येथील कर्तव्यदक्ष व विद्यार्थ्यांप्रती निस्वार्थ भावनेने कार्य करणारे शिक्षक मा. मिलिंद खोडके सर हे नियत वयोमानानुसार दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ सेवाकाळातील कार्याचा गौरव करण्यासाठी दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजी शाळेत भव्य सेवानिवृत्ती सोहळा आयोजित करण्यात आला.

आखनगिरे सर यांनी सुत्र संचालन केले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओमप्रकाश बलदवा सर होते. प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापिका पवार मॅडम, बी.ओ. मॅडम प्रिया डाहाळे, केंद्र प्रमुख वारकाड सर, शा.व.स. अध्यक्ष सुभाष जनजावळे, उपाध्यक्ष प्रशांत निखाते, ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मण ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते यांचा समावेश होता.व मेंडका नगरीचे पोलिस पाटील गोविंद वसुरे तसेच इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वनाथ चंदलवाड सर, वस्तीशाळा सेवानिवृत्त मुख्याध्यापक बोदमवाड सर, व शंकर पामलवाड



सर,गंगाधर दासरे, तुळशीराम चुकेवाड, प्रविण गायकवाड, लक्ष्मण देवदे, कैलास गोडशे, बजरंग खोडके, सूर्यकांत चौदंते, माधव कदम यांच्यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ व अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.
कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी खोडके सरांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. त्यांनी आपल्या सेवेत असताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे स्मरण करून त्यांना एक आदर्श शिक्षक म्हणून गौरविले. त्यांच्या कार्यामुळे शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावला असून, अनेक विद्यार्थी जीवनात पुढे जाण्यास सक्षम झाले आहेत, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.
कार्यक्रमात विविध मान्यवरांनी आपली भावना व्यक्त केली व उपस्थितांनी खोडके सरांना सदिच्छा निरोप दिला. शेवटी त्यांना पुढील आयुष्यात आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. दैनिक युवा आधार तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते

उंचावला असून, अनेक विद्यार्थी जीवनात पुढे जाण्यास सक्षम झाले आहेत, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.
कार्यक्रमात विविध मान्यवरांनी आपली भावना व्यक्त केली व उपस्थितांनी खोडके सरांना सदिच्छा निरोप दिला. शेवटी त्यांना पुढील आयुष्यात आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. दैनिक युवा आधार तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते यांच्यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ व अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.
कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी खोडके सरांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. त्यांनी आपल्या सेवेत असताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी

## आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त दोन दिवसांची मुंबईत बांबू परिषद

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,प्रतिनिधी**
फिनिक्स फाऊंडेशन आणि महाराष्ट्र सरकारच्या "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन" (MITRA) यांच्यामार्फत आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त मुंबईत दोन दिवसांची बांबू परिषद आयोजित करण्यात आली आहे. वातावरण बदलाचे संकट रोखून मानव जात वाचवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय बांबू दिनाचे औचित्य साधून येत्या १८ आणि १९ सप्टेंबर २०२५ मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात दोन दिवसाच्या बांबू परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.
"बांबू फॉर पीपल, प्लॅनेट अँड प्रॉस्पेरिटी : ग्रीन गोल्ड, ग्रीन एनर्जी, ग्रीन अर्थ" अशी संकल्पना घेऊन या महत्त्वपूर्ण परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसाच्या परिषदेतून पर्यावरण रक्षण आणि शाश्वत विकासासाठी नवी दिशा मिळेल. राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री पर्यावरण शाश्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी परिषदेबाबत माहिती देताना सांगितले.
पृथ्वी आज अभूतपूर्व पर्यावरणीय संकटांचा सामना करत आहे. वातावरण बदलामुळे जंगलातील आगी, ढगफुटी, महापूर आणि उष्ण लहरी यासारख्या आपत्ती वाढल्या आहेत. बांबू हा 'कल्पवृक्ष' असून, तो कार्बन शोषण, जंगलतोड रोखणे आणि जैवइंधन निर्मितीसाठी उपयुक्त असल्याचे पाशा पटेल यांनी सांगितले.
पाशा पटेल म्हणाले, 'जगभरातील देशभरातील आणि राज्यभरातील तज्ञ, अभ्यासक, शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी आणि धोरणकर्ते यांना मुंबईमधील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. मानव जातीच्या अस्तित्वाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा आणि दोन दिवसाच्या परिषदेचे आयोजन हे फिनिक्स फाउंडेशन, लोदगा जि.लातूर आणि राज्य सरकारची महाराष्ट्र सरकारच्या "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन" (MITRA) यांनी संयुक्तपणे केले आहे. काळाची पाऊले ओळखून मानव जातीच्या रक्षणासाठी 18 आणि 19 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेमध्ये होणाऱ्या दोन दिवसाच्या चर्चासत्रांमध्ये बांबूपासून इथेनॉल, मिथेनॉल, थर्मल साठी बांबू पॅलेट्स, लोखंड चारकोल, लाकूड, फर्निचर, बांबू कपडे असे अनेक उद्योग ,कौशल्य, पर्यावरण, प्लास्टिक मुक्तीतून शाश्वत म्हणजेच सस्टेनेबल डेव्हलपमेंट च्या दिशेने वाटचाल अपेक्षित असणार आहे. शहरी वनीकरण (Urban Forest), ऑक्सीजन पार्क, ग्रीन बिल्डिंग अशा अनेक नवकल्पना या परिषदेतून पुढे येणार आहेत.'
बांबू परिषद महाराष्ट्राला बांबू राजधानी बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. परिषदेत जगभरातील तज्ञ, शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत.

## पत्रकारावर खोटे आरोप, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर.

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**
युवा ग्रामीण पत्रकार संघ, ढाणकी यांच्या वतीने बंटी दत्तात्रय फुलकोंडवार या पत्रकारावर खोटे आरोप लावून त्याची बदनामी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. पत्रकार संरक्षण कायद्यानुसार दोषींवर दंडात्मक कारवाई करून पीडित पत्रकाराला न्याय मिळावा, अन्यथा संविधानिक मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. पत्रकार संघाचे अध्यक्ष शे. इरफान शे. गुलाब, सचिव अशोक गायकवाड व उपाध्यक्ष करण भरणे यांच्या सहीने दिलेल्या निवेदनात ग्राम महसूल अधिकारी मोईट (म.) राहुल अशोक भोजने आणि सहाय्यक कृषि अधिकारी सोईट (म.) राहुल उद्धव वाघमारे यांच्या ईशाऱ्यावरून काही लोकांनी बंटी दत्तात्रय फुलकोंडवार यांच्याविरुद्ध खोट्या तक्रारी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदना नुसार, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानापासून वंचित ठेवण्याचा अन्याय उघडकीस आणणाऱ्या फुलकोंडवार यांनी प्रशासनाकडे तक्रार केली होती. परंतु, प्रशासनाने तक्रार निकाली काढण्याऐवजी त्यांच्यावरच आरोप करून त्याची प्रतिमा मळवण्याचा प्रयत्न केला.
पत्रकार संघाने स्पष्ट केले की, बंटी फुलकोंडवार हे दत्तात्रय फुलकोंडवार यांचे सुपुत्र असून, त्यांनी शेतकऱ्यांसाठी वंचित अनुदान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यावर गावातील काही लोकांना हाताशी धरून त्यांच्यावर आरोप लावण्याचा प्रयत्न झाला. यामुळे पत्रकारितेवर घाला येण्याची शक्यता निर्माण झाली असून अशा प्रकारांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी दोषी तलाठी आणि कृषी सहाय्यक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.
निवेदनाची प्रत जिल्हा कृषी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी उमरखेड यांनाही पाठविण्यात आली असून पत्रकार संरक्षणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.





# वेळीच शस्त्रक्रिया केल्याने 'तिला' पुन्हा ऐकू येऊ लागले

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलसमध्ये केले यशस्वी शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई** : सर्व इंद्रियांपैकी सर्वात महत्वाचे इंद्रिये म्हणजे आपले कान. ज्यातून आपण तो आवाज आपल्या मेंदूला ऐकवतो. तेव्हाच आपला मेंदू प्रतिसाद देतो. असेही बरेच लोक आहेत ज्यांना कानातून ऐकण्याची किंवा श्रवणशक्ती कमी होण्याची समस्या आहे. अशाच एका प्रकरणात खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला यांच्या नेतृत्वाखाली टिमने एका ३४ वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार करत तिची श्रवणशक्ती परत मिळाली असून रुग्णाला कामाच्या ठिकाणी कराव्या लागणाऱ्या संघर्षाला पूर्ण विराम मिळाला आणि तिच्या वैवाहिक जीवनातला आनंदही परतला आहे. खारघर येथील ३४ वर्षीय दीपिका गाला (नाव बदलले आहे)* हिला ओटोस्क्लेरोसिसचे निदान झाले, जी एक आनुवंशिक स्थिती असून कानाच्या आतील हाडांच्या जास्त वाढीमुळे बहिरेपणाची समस्या उद्भवते. वर्षानुवर्षे श्रवणयंत्रांचा वापर केल्यानंतर अखेर तिच्यावर स्टेपेडोटॉमी शस्त्रक्रिया करण्यात आली, जिथे एका लहान ३.७५ मिमी टेफ्लॉन पिस्टन इम्प्लांटने तिची श्रवणशक्ती पुनर्संचयित करण्यात आली. आज तिला अगदी स्पष्ट ऐकू येत असून तिच्या वैयक्तिक जीवनातील आनंदाचे क्षण परतले आहेत.

दोन वर्षांपूर्वी दीपिका गाला (नाव बदलले आहे)* (३४ वर्षे) हिला श्रवणशक्ती कमी झाल्याची लक्षणे जाणवू लागली. साध्या संभाषणांमध्ये देखील तिचा गोंधळ उडणे तसेच कामाच्या ठिकाणी तिला संघर्ष करावा लागत होता. कधीकधी तर तिला तिच्या कानात सतत काहीतरी वाजतंय असं अनुभव येऊ लागला, ज्यामुळे ती अस्वस्थ आणि चिंताग्रस्त झाली. जरी तिला यामुळे जास्त वेदना होत नसल्या तरी स्पष्टपणे ऐकू न येणे हे तिच्या एकटेपणाचे कारण ठरत होते.
जेव्हा ती उपचाराकरिता मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल झाली तेव्हा तिच्या काही तपासण्या करण्यात




आल्या ज्यात तिच्या कानातील श्रवणशक्ती कमी झाल्याचे आढळून आले. त्यावेळी तिला शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देण्यात आला होता, परंतु तिने ते मनावर न घेता त्याऐवजी श्रवणयंत्रांचा वापर करण्याता निर्णय घेतला. या उपकरणांमुळे तिला तात्पुरता दिलासा मिळाला मात्र, तिला अजूनही स्पष्ट ऐकू येत नव्हते आणि या उपकरणांमुळे तिला तिच्या सहकाऱ्यांसमोर अस्वस्थ वाटू लागले, ज्यामुळे आत्मविश्वास खालावल्याने त्याचा कामावरही परिणाम झाला.
गेल्या वर्षी तिचे लग्न झाले, मात्र लग्नानंतरच्या पहिल्याच वर्षात घरातील तणाव वाढू लागला. स्पष्टपणे ऐकू न येण्यामुळे पती आणि सासरच्या लोकांमधील गैरसमज वाढत गेले. रोजची संभाषणं वादात बदलू लागली कारण ती अनेकदा योग्य वेळी योग्य प्रतिसाद देऊ शकत नव्हती. ती मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचून गेली होती. त्यानंतर ती पुन्हा मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये परतली व शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.
मेडिकव्हर हॉस्पिटलचे कन्सल्टंट ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला सांगतात की, या दोन वर्षात हळूहळू तिची श्रवण क्षमता कमी कमी होत गेली. ओटोस्क्लेरोसिस ही अशी स्थिती आहे जिथे मधल्या कानातील स्टेप्स हाड स्थिर होते आणि आतील कानात आवाज प्रसारित करण्यात अयशस्वी होते. ओटोस्क्लेरोसिस हे भारतात बहिरेपणाचे एक सामान्य कारण आहे, बहिरेपणा आणि कानाचा पडदा अखंड असलेल्या रुग्णांमध्ये असे ९.२% रुग्ण आढळतात.
रुग्णाच्या आईलाही अशीच समस्या होती आणि २ वर्षांपूर्वी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये तिची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ओटोस्क्लेरोसिसमध्ये ही एक अनुवांशिक स्थिती असून जर एका पालकाला ओटोस्क्लेरोसिस असेल तर त्यांच्या बाळाला तो होण्याची शक्यता २५% इतकी असते. जर दोन्ही पालकांना ओटोस्क्लेरोसिस असेल तर हा धोका ५०% पर्यंत वाढतो. हार्मोनल बदलामुळे ओटो स्क्लेरोसिस असलेल्या महिलांमध्ये गर्भधारणेमुळे देखील श्रवणशक्ती कमी होऊ शकते.
डॉ. वाघेला पुढे सांगतात की, या शस्त्रक्रियेला स्टेपेडोटोमी असे म्हणतात आणि ती सर्वात नाजूक सूक्ष्म शस्त्रक्रिया पैकी एक आहे. ती या प्रक्रियेसाठी योग्य होती कारण तिची श्रवणशक्ती खुप कमी झाली होती व शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नव्हता. त्यासाठी स्टेप्स हाडात एक लहानसे छिद्र पाडून केवळ 3.75 मिमी (3.5 ते 5 मिमी पर्यंत) पिस्टन प्रोस्थेसिस बसवणे गरजेचे आहे. खूप लहान आकाराचा पिस्टन श्रवणशक्ती पुनर्संचयित करू शकत नाही, तर खूप लांब असा पिस्टनमुळे चक्कर येऊ शकते. परंतु ही प्रक्रिया अचूकपणे पार पाडल्यास त्याचे परिणाम उत्तम आहेत. रुग्णाच्या श्रवणशक्तीत लक्षणीय सुधारणा झाली आणि तिला आता कोणत्या यंत्राची देखील आवश्यकता भासत नव्हती. ही प्रक्रिया सुमारे एक तास चालली आणि रुग्णाला दुसऱ्याच दिवशी घरी सोडण्यात आले. योग्य वेळी शस्त्रक्रिया न केल्यास श्रवणशक्तीची समस्या आणखी वाढली असती. आज या रुग्णाने श्रवणयंत्रांचा वापर पूर्णपणे बंद केला आहे आणि ती या शस्त्रक्रियेच्या परिणामांमुळे खूप आनंदी आहे.
पूर्वी मला साधे संभाषण ऐकू येत नसल्याने मला अस्वस्थ वाटायचे. बऱ्याचदा मी काही चुकीचे बोलेल की काय याची भीती वाटत होती. मी योग्य वेळी प्रतिसाद न दिल्याने बऱ्याच लोकांना वाटायचे की मी त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत आहे. हळूहळू मी चारचौघात जाणे टाळू लागली. मात्र जेव्हा मी मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉ. राजेंद्र वाघेला यांची भेट घेतली त्यानंतर मात्र माझ्या आयुष्याला खरी कलाटणी मिळाली अशी प्रतिक्रिया रुग्ण दीपिका गाला (नाव बदलले आहे)* यांनी व्यक्त केली.

# युवक आधार

वर्ष : २ अंक : 356 गुरुवार दि. 11 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6






# दैनिक युवक आधार वर्धापन दिना चा सोहळा उत्साहात साजरा



































